सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. २४ ठ. क्र. ........ दि. १८/५/१६ रोजी ठेवला असता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



हॉटेल ॲम्बॅसिडर ते लोकमंगल ऑक्सीपार्क येथे नव्याने रस्ता दुरुस्त करण्यात आलेला आहे. सदरील रस्त्यास **कै. सौ. अलकाताई पुरुषोत्तम बरडे मार्ग** असे नामकरण करणेस, नामफलक करणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा.नामाविधान समितीकडे पाठविणेस मान्यता देण्यात येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या महकूब/तहकूब/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. २९ ठ. क्र. ९९
दि. १८/५/१६ रोजी अनेक खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. २१ कर्णिक नगर मध्ये मागील १५ वर्षापासून करुणाशील बहुउद्देशीय सामाजिक संस्था, सोलापूर तर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती ही मोठया प्रमाणात साजरी केली जाते. सदरची संस्था रजिष्टर्ड असून त्याचा नंबर एफ-१५८९३/२००५ सोलापूर असा आहे. यंदाही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची १२५ वी जयंती साजरी करण्यात येत आहे. या जयंती निमित्त प्र.क्र. २१ मध्ये सोलापूर जिल्हा बास्केट बॉल स्पर्धा तसेच क्रिकेट स्पर्धा, रांगोळी स्पर्धा अशा विविध स्पर्धा घेण्यात येत आहेत. तरी उपरोक्तकामी करुणाशील बहुउद्देशीय सामाजिक संस्था सोलापूर या संस्थेस जास्तीत जास्त अर्थसहाय्य देणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा.महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्वसाधारण सभेपुढे ... २५... ठ. क्र. ८८
दि. १८/५/१५ ... खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. १२ मधील मनोहर झोपडपट्टी येथे ड्रेनेज लाईन टाकण्यात आलेली आहे. परंतू प्रत्येक घराला जोडलेली नसल्यामुळे या परिसरातील नागरिकांची गैरसोय होत असून तेथील नागरिक उघडयावर सांडपाणी टाकत असल्यामुळे तो संपूर्ण परिसर दलदलीचा निर्माण होऊन रोगराई पसरत आहे. तेव्हा असलेल्या लाईन वरुन प्रत्येक घराला घरजोड ड्रेनेज कनेक्शन देणे अत्यंत गरजेचे झाले आहे. तरी उपरोक्त परिसरात महाराष्ट्र प्रांतिक महाअधिनियम १९४९ चे कलम १८८ (२) नुसार घरजोड ड्रेनेज कनेक्शन करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.२५ ठ. क्र.९९ दि.२६/५/१६ रोजी ठेवला वालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला



सोलापूर शहरातील मोदी परिसरात असलेल्या मोदी पोलीस चौकीच्या बाजूस तयार होणाऱ्या चौकास **अलंकार चौक** असे नामकरण करणेस व त्याप्रमाणे सदर ठिकाणी नामफलक लावणेस व याकामी येणारे खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा.नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र. २५ ठ. क्र. १००
दि. २८/५/१६ रोजी ठेवला त्यावरील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला



विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त सोलापूर शहरातील महाराष्ट्र शासनाच्या वतीने दिला जाणारा दलित मित्र पुरस्कार प्राप्त व्यक्ती व संस्थाचा सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने यथोचित सत्कार करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर [illegible] पालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या [illegible]/मागासलेली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे [illegible] ३० ..... ठ. क्र. ७०९
दि. १८/५/१६ रोजी ठरला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



१२ व्या शतकातील थोर संत वीर कक्कय्या महाराज हे ढोर समाजाचे आराध्य दैवत असून कातडी स्वच्छ करुन त्यापासून व्यावहारिक कातडी बनविणारा समाज म्हणजे ढोर समाज, या ढोर समाजाच्या उन्नतीसाठी संत वीरशैव कक्कय्या महाराज यांनी केलेले कार्य अत्यंत स्फूर्तीदायक आहे. बसवेश्वराच्या वीरशैव पंथाची किर्ती ऐकून ते बसवकल्याण येथे गेले व त्यांनी समाजकार्य केले. अशा या थोर संताची आठवण व विचार समाजापुढे आदर्श निर्माण करण्यासाठी आवश्यक आहे. तसेच समाजाच्या उध्दारासाठी त्यांनी जे महान कार्य केले आहे ते लोकांना सदैव प्रेरणादायी ठरण्यासाठी संत वीरशैव कक्कय्या महाराज यांचा पुतळा सोलापूर शहरातील चार हुतात्मा पुतळया शेजारी बसविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा.पदाधिकारी यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष
सर्वसाधारण सभेपुढे ... 39 ठ. क्र. १०२
दि. १८/५/१६ ... रोजी ...
[illegible]



श्री. सिद्राम शिवलिंग मोरे,राहणार जुना विजापूर नाका, आंबेडकर नगर, सोलापूर यांची मुलगी कु.प्रीती सिद्राम मोरे हिला डेंग्यू हा आजार झाला असून साठे नर्सिंग होम लकी चौक येथील खाजगी हॉस्पिटलमध्ये उपचार घेतले आहे. श्री.सिद्राम शिवलिंग मोरे हे मोलमजुरी करतात व त्यांच्या घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरीबीची आहे त्यामुळे कु.प्रीती मोरे हिच्या औषधोपचारासाठी आर्थिक झळ सोसावी लागत आहे. तरी कु.प्रीती मोरे हिच्या औषधोपचारासाठी मनपाकडून जास्तीत जास्त अर्थसहाय्य मिळण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा.महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.३२... ठ. क्र.२०३
दि. २६/५/१६ रोजी ठेवला असता तो सर्व
बहुमताने/सर्वानुमते मान्य झाला



सम्यक विचार मंच ही संस्था सोलापूर शहरातील मागासवर्गीय कर्मचा-यानी सामाजिक बांधीलकी स्वीकारुन स्थापन केली असून सदर संस्थेच्या वतीने सन १९९९ पासून म.फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त शहरात भव्यप्रमाणात मिलिंद व्याख्यानमाला आयोजित केली जाते. सदर व्याख्यानमालेमध्ये वेगवेगळया विषयाच्या तज्ञ व अभ्यासू वक्त्यांना पाचारण करुन शहरातील नागरिकांना विविध विषयांची बौध्दिक माहिती दिली जाते. त्यातून सामाजिक व शैक्षणिक प्रबोधन केले जाते. १४ एप्रिल २०१६ महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती असल्याने ती मोठया उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बहुजन समाजाच्या उध्दारासाठी जे महान कार्य केले आहे ते लोकांना सदैव प्रेरणादायी ठरण्यासाठी दि.११ एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधीत मिलिंद व्याख्यानमालेसाठी सायंकाळी ६.३० वाजता हुतात्मा स्मृती मंदिर बौध्दिक व्याख्यानमालेस मोफत देण्यास मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या महत्वाच्या/साप्ताहिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे ...... ३३..ठ. क्र...१०४
दि..२८/५/१६.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



विद्यानिकेतन हायस्कूल ते पपीया जनरल स्टोअर्स गणेश पेठ हया रस्त्यास **हाजी ईस्माईल हाजी अब्दुल गफूर चामाकोरा मार्ग** असे नामकरण करणेस, नावाचा फलक लावणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा.नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासूली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.३८.....ठ. क्र.९०५...
दि...९८/५/९६......रोजी ठेवता आलेला श्री. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

३४

श्री. बाबूराव शंकरराव साबणे राहणार घर नं. ७६९, उत्तर कसबा, कुंभारवाडा, सोलापूर यांना पाठीच्या मणक्याचा आजार असून त्यांच्या पाठीमध्ये स्क्रू लावलेले आहेत. त्यांच्यावर चितळे हॉस्पीटल सोलापूर व यशोधरा हॉस्पीटल सोलापूर येथे औषधोपचार घेतलेले आहेत. सदर उपचाराकरिता त्यांना २.५ लाख खर्च झाला असून त्यांनी मदतीची अत्यंत आवश्यकता आहे. श्री. बाबूराव शंकरराव साबणे यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची व हलाखीची असल्याने सोलापूर महानगरपालिकेतर्फे जास्तीत जास्त तातडीची वैद्यकीय मदत देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा.महापौर यांना अधिकार देण्यांत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढील विषय क्र. ३५ ठ. क्र. २०६
दि. २६/५/१६ रोजी ठेवले खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



उजनी येथे सध्या अस्तित्वात असलेली पाण्याची पाईपलाईन दररोज ९० एमएलडी, एनटीपीसीची जूनमध्ये कार्यरत होणारी दररोज ७५ एमएलडी व टाकळी सोरेगांव येथे असलेली ९० एमएलडी व हिप्परगा १० एमएलडी दररोज असे २६० एमएलडी पाणी शहरामध्ये उपलब्ध होऊ शकते. स्मार्ट सिटीकडे घोडदौड करणा-या सोलापूरला आपण निश्चित दररोज पाणी पुरवठा करण्याची योजना २४ x ७ म्हणजेच २४ तास दररोज पाणी पुरवठा करु शकतो. याकामी स्वतंत्र तांत्रिक विभागाची स्थापना करणे आवश्यक आहे. दैनंदिन पाणी पुरवठा करणारे अधिका-यांकडे सदरचे कामकाज देऊ नये. यामध्ये मिटरायझेशनची व्यवस्था करणे पाण्याची गळती थांबविणे, अनाधिकृत नळांचा शोध लावणे, ५७ टक्के पाण्याचे पैसे मनपास उपलब्ध होत नाहीत. यापूर्वी केंद्र शासनाने नेमलेल्या अहवालामध्ये सदर बेहिशोबी पाण्याची बाब नमूद झालेली आहे. सदरची बाब पाणी पुरवठा सुधारणा होण्याच्या दृष्टीने गरजेची आहे. ही वरील कार्यवाही केल्याशिवाय स्मार्ट सिटीची संकल्पना सिध्द होणार नसल्याने, व या ठिकाणी राहणा-या रहिवाशांना पाण्याचे दुर्भिक्ष्य न जाणवता पाण्याची सोय होणेचे दृष्टीने विनाविलंब यानुसार पुढील जरुर ती कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका